**प्रेसनोट दि.०६/१२/२०२३**

**सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी लोकसेवक श्री.विष्णु मारुतीराव कांबळे, वय-५९ वर्षे, (सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली, वर्ग – १, सध्या रा.शिवशक्ती मैदानाचे पाठीमागे, बारबोले प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी, जि.सोलापुर यांनी भ्रष्ट मार्गाने अपसंपदा धारण केले बाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी लोकसेवक श्री.विष्णु मारुतीराव कांबळे यांचेविरुध्द लाचेची मागणी केल्याचे तक्रारीवरुन सापळा कारवाई दरम्यान शिक्षणाधिकारी श्री.विष्णु मारुतीराव कांबळे यांना लाच रक्कमेसह पकडण्यात आले. त्याचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये दिनांक ०७/०५/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने त्याचे घरझडती दरम्यान एकुण रोख रक्कम १०,०१,१५०/- रु. मिळुन आलेने सदर रक्कमे बाबत श्री.विष्णु कांबळे हे समाधानकारकरित्या खुलासा अथवा कागदपत्रे हजर करु शकले नाहीत. त्यांचेविरुध्द उघड चौकशी चालु करण्यात आली होती प्रस्तुत उघड चौकशी मध्ये सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी लोकसेवक श्री.विष्णु मारुतीराव कांबळे, यांनी आणि त्यांची पत्नी सौ.जयश्री विष्णु कांबळे यांनी दिनांक १६/०६/१९८६ ते दिनांक ०६/०५/२०२२ या परिक्षण कालावधीत त्यांनी संपादीत केलेली मालमत्ता त्यांचे ज्ञात स्त्रोताच्या उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत असल्याने श्री.विष्णु कांबळे यांनी रक्कम रुपये ८२,९९,९५२/- रुपये (३६ टक्के) इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण केली व त्यासाठी त्यांची पत्नी सौ.जयश्री विष्णु कांबळे यांनी त्यांना अपप्रेरणा दिली असल्याने श्री.विष्णु मारुतीराव कांबळे व त्यांची पत्नी सौ.जयश्री विष्णु कांबळे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये विश्रामबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.श्री.अमोल तांबे सोा पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सोा, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :-**

**१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net**

**२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB**

**३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in**